# परुळेकर यांच्या ब्लॉगमुळे टीम अण्णातील कलह उघड

नवी दिल्ली, ५ नोव्हेंबर/विशेष प्रतिनिधी

टीम अण्णाच्या कोअर समितीची फेररचनेवरून ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे ब्लॉगर, ज्येष्ठ पत्रकार राजू परुळेकर त्यांच्यावरच 'उलटल्या'नंतर अण्णांनी राळेगणसिद्धीला जाऊन आपला ब्लॉग बंद करण्याची आज दिल्लीत घोषणा केली. मात्र, कोअर समितीच्या फेररचनेविषयी परुळेकर यांनी खुद्द अण्णांनी लिहिलेले, पण आजवर प्रसिद्ध न झालेले पत्र ब्लॉगवर टाकल्यामुळे टीम अण्णामध्ये धुमसत असलेला कलह चव्हाट्यावर आला आहे.

अरविंद केजरीवाल, किरण बेदी आणि प्रशांत भूषण या त्रिकुटाला विटलेल्या अण्णांनी कोअर समितीची फेररचना करण्याची भावना स्वतःच्या स्वाक्षरीनिशी कागदावर उतरविली आणि त्याविषयी आपल्याशी अनेकदा चर्चाही केली, असा दावा अण्णांचे ब्लॉगर परुळेकर यांनी केला आहे. 'मी लवकरच कोअर कमिटीची पुनर्रचना करण्याचे ठरवित आहे. त्यासाठी टीम अण्णाच्या सर्व सभासदांना कळवित आहे' असे २३ ऑक्टोबर रोजी अण्णांच्या हस्तलिखित पत्राच्या सुरुवातीलाच नमूद करण्यात आले आहे. या पत्राअखेर अण्णांची स्वाक्षरी आहे. अण्णांचे हे हस्तलिखीत त्यांच्याच ब्लॉगवर उपलब्ध आहे.

दिल्लीत शुक्रवारी झालेल्या अण्णांच्या पत्रकार परिषदेदरम्यान परुळेकर अण्णांच्या ब्लॉगवर त्यांच्या विचारांशी विसंगत मतप्रदर्शन कसे करतात, असा प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाला उत्तर देताना कोअर समितीची फेररचना करणार असल्याचे परुळेकर यांना आपण कधी लिहून दिलेले नाही, त्यांना भेटलोही नाही किंवा त्यांच्याशी चर्चाही केली नाही. परुळेकर असा दावा करीत असतील तर त्यांना आपण जाब विचारू, असे अण्णांनी म्हटले होते.

टीम अण्णा भंग करण्याविषयी आपण कधीही पत्र लिहिले नाही, असा दावा आज परुळेकर यांच्या आरोपाला उत्तर देताना अण्णांनी केला आहे. अण्णांच्या १९ दिवसांच्या मौनव्रतादरम्यान केजरीवाल, किरण बेदी, प्रशांत भूषण या सहकाऱ्यांवर अनेक आरोप झाले. या दरम्यान कोअर समिती भंग करण्याचा विचार मनात डोकावला होता, अशी कबुलीही अण्णांनी दिली. मनात येणारे सर्व विचार आपण कागदावर लिहून काढतो. आपले तेच पत्र खरे मानावे ज्यावर आपली स्वाक्षरी असते, असेही अण्णांनी म्हटले आहे. राळेगणसिद्धीला परतल्यानंतर ब्लॉग बंद करण्याचीही घोषणा अण्णांनी केली. टीम अण्णा मोडीत काढण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहे, असाही आरोप अण्णांनी केला.

३० ऑक्टोबरला अण्णांना भेटून केजरीवाल, बेदी आणि प्रशांत भूषण दिल्लीला परतल्यानंतर अण्णांनी आपल्याला बोलविले आणि एकांतात झालेल्या चर्चेत कोअर समिती कायम राहील, असे आपल्याला सांगितले. केजरीवाल, बेदी आणि प्रशांत भूषण हे लोकशाहीला न मानणारे, फॅसिस्ट आणि अण्णांच्या विचारांचा आदर न करणारे लोक आहेत. अण्णांच्या कोअर समितीवर त्यांची घट्ट पकड आहे. त्यांचा विरोध केल्यामुळे मला लक्ष्य करणयात येत आहे. माझ्यापाशी सर्वांविरुद्ध पुरावे आहेत आणि एकापाठोपाठ एक त्यांचे कच्चे दुवे आपण मांडणार असल्याचा निर्धार परुळेकर यांनी केला आहे. ■